Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वर्धा जिल्हयातील पतपुरवठा व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती: एक अध्ययन

**प्रा. राजीव म. जाधव[१] , डॉ. बबनराव बी. तायवाडे[२]**
[१]संशोधनकर्ता, वाणिज्य विभाग , लोक महाविद्यालय, वर्धा.
[२]मार्गदर्शक, प्राचार्य, धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर.

**सारांश**

वर्धा जिल्ह्यातील पतपुरवठा व त्यांचा माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे कोणत्या अनुकूल व प्रतिकूल बाबी घडल्या आहेत, शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत कसा बदल झाला आहे? हे अभ्यासने आवश्यक आहे आणि वर्धा जिल्ह्यातील पतपुरवठा संस्था कडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती: एक अध्ययन या विषयाचा अभ्यास करतांना पुढील उद्दीष्टांच्या पूर्तीकरीता खालील संशोधन विषय संशोधनाकरीता निवडण्यात आला.

**प्रस्तावना**

भारतामध्ये प्राथमिक सहकारी पतपेढयांचे व्यवहार आणि संघटन हे दुय्यम पातळीवरील बँकाहून अनेक बाबतीत भिन्न बनते. हे मात्र खरे सहकारी पतपेढी (प्राथमिक) ही एखाद्या बचत संस्थेप्रमाणे केवळ माध्यमिक (इंटरमिडिअरी) संस्था बनते. सभासदांच्या ठेवी एकत्रीत करणे व गरजू सभासदांना कर्जाच्या स्वरुपात त्या उपलब्ध करणे एवढेच खरे कार्य त्या करीत असतात. सभासद त्यांचे ग्राहक असतात. त्याबाहेरचे ग्राहक सहकारी प्राथमिक संस्थेत संभवत नाही. ग्राहक हा ठेवीदारही असू शकतो किंवा तो ऋणकोही बनू शकतो. त्यांच्या गरजेप्रमाणे सहकारी प्राथमिक संस्थांनी बाहेरच्या संस्थांकडून भांडवल गोळा केले तरी त्यांच्या या मुलभूत स्वरुपात बदल होत नाही. क्वचित बिगरसभासदांकडून ठेवी गोळा केल्या तरी त्यांनी कर्जपुरवठा केला जात नाही. हे आर्थिक व्यवहार करण्याची जी साधने, लेख (डॉक्युमेंट्स) वापरावयाचे ते अन्य बँकाकडून फार निराळे नसतात. दुय्यम पातळीवरील सहकारी बँका चेक, हुंडी, बिल, वचनचिठ्ठी आदिंचा वापर करतात आणि त्यांच्या अनुषंगाने होणारे पत निर्मितीचे बँकिंगचे कार्यही

दुय्यम संस्थांना अर्थात करावले लागते. अशा पातळीवरील त्यांचे ग्राहक या व्यक्ति अथवा संस्थाही असतात. सहकारी बँकांनपी दुय्यम संस्थांनी व्यापारी बँकांच्या स्वरुपाचे व्यवहार करावेत की करु नयेत हा एक वादाचा प्रश्न समजला जातो. स्थूलरुपाने केलेल्या प्रास्तावित विवेचनाच्या आधारे आपल्याला सहकारी बँकेची, सहकारी पतपुरवठयाची सामान्य व्याख्या करता यावयास करकत नाही. सहकारी बँक म्हणजे काय? केवळ सहकारी तत्त्वाच्या आधारे चालविलेली बँक ही व्याख्या पुरेशी नाही.

"गरजू व्यक्तींनी एकत्र येऊन संघटीत केलेली त्यांची व त्यांनी नियंत्रित केलेली, परस्पर हिताचे आणि बचतीचे संवर्धन व संरक्षण करणारी आणि सवलतीच्या दराने व सोयीस्कर परतफेडीच्या शर्तीवर कर्ज पुरविणारी संस्था", अशी एक व्याख्या सांगता येईल. काहीजण सहकारी पतपेढीचे व्यक्तिहीत संरक्षक तत्त्व हे व्यवच्छेदक लक्षण समजतात. या संस्था सभासदाचे सावकार, महाजनादी व्यक्तीपासून संरक्षण करतात. संस्थेत एकत्र येणारे गरजू सभासद आपल्या बचती एकत्र करुन गरजू व्यक्तींना पुरवितात व अशा रितीने खासगी बँक वा सावकार यांना जाणारा लाभाचा वाटा थोपवितात व तो विविध सवलतीच्या दराने शेवटी सहकारी संस्थेच्या सभासदांत वाटला जातो. ठेवीदार व ऋणको सभासदांत तो जवळजवळ सारख्याच प्रमाणात विभागला जातो. थोडक्यात सांगावयाचे तर ही संस्था खाजगी बँका सावकार आणि महाजनादी विरुद्ध बंड पुकारण्याचे सामर्थ्य शक्तिहीन पण गरजू लोकांना उपलब्ध करुन देते.

सरकारी पतपेठी छोटे उत्पादक (शेतकरी वा व्यवसायिक) अथवा कामगार यांनी एकत्र येऊन स्थापलेली असते, ती संयुक्त व्यवस्थेखाली लोकशाही पद्धतीने ते चालवितात. सभासदत्वावर मर्यादा नसतात आणि संस्थेची संपत्तीक साधने संयुक्त मालकीची असतात. आपापल्यसा छोटया बचती एकत्र करणे व गरजेच्या वेळी कर्ज मिळण्याची व्यवस्था करणे हे पारस्परिक सेवेचे उद्दीष्ट संस्थेच्या डोळयापुढे असते. मिळणारे कर्ज सवलतीच्या व्याजदराने व सवलतीच्या परतफेडीच्या शर्तीवर मिळते. संस्थेला वर्षअखेरी व्यवहारांतून जे आधिक्य (सरप्लस) मिळते ते सहकारी संस्थेच्या निधीत जमा केले जाते अथवा ठेवीदार, ऋणको, सभासद यांच्यात विभागले जाते. बाहेरुन जेव्हा ही संस्था सांपत्तिक साधने गोळा करते अथवा कर्जाऊ आणते तेव्हा सभासदांचे संयुक्त उत्तरदायित्व हे त्यासाठी तारण असते.

**सारणी क्रमांक १ : शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ मिळण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| **शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ४२ | ५२.५ |
| नाही | ३८ | ४७.५ |
| **एकूण** | **८०** | **१००.०** |
| Chi -square | DF | P-value |
| 0.2 | 1 | NS |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वातंत्र्यांश;
P-value- P मूल्य सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ मिळण्यासंबंधी उत्तरदात्यांच्याप्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५२.५ टक्के उत्तरदात्यांच्यामते शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ मिळाला असून ४७.५ टक्के उत्तरदात्यांच्यामते शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ मिळाला नाही. वरील माहितीनुसार शेतकऱ्यांना उपरोक्त पतपुरवठामुळे आर्थिक स्थितीत लाभ मिळण्यासंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांची तुलना केली असता त्यादरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य: ०.२, स्वातंत्र्याश: १, सार्थकता: NS) फरक नसल्याचे आढळले. म्हणजेच बहुतांश उत्तरदात्यांच्या मते उपरोक्त पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत लाभ झाला आहे.

**सारणी क्रमांक २ : शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूपांसंबंधी माहिती**

| **शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| उत्तम | ४२ | ५२.५ |
| काही प्रमाणात | २३ | २८.८ |
| अत्यल्प | १५ | १८.८ |
| **एकूण** | **८०** | **१००** |
| Chi -square | DF | P-value |
| 14.425 | 2 | <0.05 |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वातंत्र्यांश;
P-value- P मूल्य सार्थकता

प्रस्तुत सारणी क्रमांक २ मध्ये शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूपांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. वरील माहितीनुसार ५२.५ टक्के उत्तरदात्यांच्या मते शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप उत्तम असून २८.८ टक्के उत्तरदात्यांच्या मते शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप काही प्रमाणात होते. तसेच १८.८ टक्के शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप अत्यल्प होते.

शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालल्या आर्थिक लाभाचे स्वरूपांसंबंधी माहितीची तुलना केली असता त्यादरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य: १४.४२५, स्वातंत्र्याश: २, सार्थकता:<०.०५) फरक नसल्याचे आढळले. म्हणजेच महत्वपूर्णपणे अधिक उत्तरदात्यांच्या मते शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप उत्तम असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ३ : शेतकऱ्यांना या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढीसंबंधी उत्तरदात्यांच्याप्रतिक्रिया**

| **शेतकऱ्यांना या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ५२ | ६५.० |
| नाही | १६ | २०.० |
| सांगता येत नाही | १२ | १५.० |
| **एकूण** | **८०** | **१००** |
| Chi -square | DF | P-value |
| 36.401 | 2 | <0.05 |

Chi Square – काई वर्ग मूल्य; DF- (Degrees of Freedom) स्वातंत्र्यांश;
P-value- P मूल्य सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये शेतकऱ्यांना या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढीसंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६५.० टक्के उत्तरदात्यांच्या मते या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ झाली असून २०.५ टक्के उत्तरदात्यांच्या मते या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ झाली नाही. तसेच १५.० टक्के उत्तरदात्यांच्या मते या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढीत अनिश्चितता होती. वरील माहितीनुसार शेतकऱ्यांना या पतपुरवठामुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढीसंबंधी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांची तुलना केली असता केली असता त्यादरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य: ३६.४०१,

Review Of Research
Vol. 3, Issue. 2, Nov. 2013
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

स्वातंत्र्याश: २, सार्थकता: <०.०५) फरक असल्याचे आढळले. म्हणजेच बहुतांश उत्तरदात्यांच्या मते या पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ होत असल्याचे आढळले.

**निष्कर्ष**

उत्तरदात्यांच्यामते शेतकऱ्यांना उपरोक्त योजनांच्या लाभाचा स्तर उत्तम आहे. उपरोक्त पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत लाभ झाला आहे. शेतकऱ्यांना पतपुरवठामुळे उत्तम स्वरूपाचा आर्थिक लाभ झाला आहे. या पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ झाली. या पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या स्वरोजगारात वृद्धी झाली. या पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नात वाढ झाली. या पतपुरवठामुळे शेतकऱ्यांच्याा आर्थिक स्थितीत वाढ झाली.

**संदर्भग्रंथ सुची**

- पु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, तिसरी आवृत्ती, १९८७, पृ.क्र. १२६.
- V.P. Michale, Research Methodology in Management, Himalaya Publishing house, 1st Ed., Pg. 113.
- रा.ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, १९
- ९२, पृ.क्र. २१.
- V.P. Michale, Research Methodology in Management, Himalaya Publishing house, 1st Ed., Pg. 15.
- P. Saravanavel, Research Methodology, Kitab Mahal, Allahabad, 1st Edition, 1987, P. 36.
- Arlene Fink, The Survey Hand Book, Volume 1, Stage Publication, New Delhi, 1st Edition, 1995, P. 25-25.
- पु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, तिसरी आवृत्ती, १९८७, पृ.क्र. ३६६.
- रा.ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, १९९२, पृ.क्र. १७३.
- पु.ल. भांडारकर, सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, तिसरी आवृत्ती, १९८७, पृ.क्र. ३७१.
- रा.ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, १९९२, पृ.क्र. १७३.
- तत्रैव, पृ. १८३.
- तत्रैव, पृ. ७४-८२.

- तत्रैव, पृ. १२९–१३२.
- P. Saravanavel, Research Methodology, Kitab Mahal, Allahabad, 1st Edition, 1987, P. 183.